**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप / कराराचं सर्व स्तरातून स्वागत

- प्रधानमंत्र्यांचा क्वालालंपूरमधे भारतीय समुदायाशी संवाद

- महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी ५२ टक्के मतदान

- गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षादलांच्या कारवाईत ७ नक्षली ठार तर छत्तीसगडमधे ५१ नक्षलींचं आत्मसमर्पण

**आणि**

- टी-२० क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत अमेरिकेविरूद्धच्या सामन्यात भारताची खराब सुरुवात

**<><><><><>**

भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप देण्यात आलं आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये ही माहिती दिली. या मसुद्यानुसार अमेरिकेत भारतीय वस्तूंवर लादलेलं आयात शुल्क कमी करुन ते १८ टक्क्यांपर्यंत कमी केलं जाईल, असं ते म्हणाले. यामुळे वस्त्रोद्योग आणि वस्त्रप्रावरणं, चामडं आणि पादत्राणं, प्लॅस्टिक आणि रबरापासून बनवलेल्या वस्तू, सेंद्रिय पदार्थ, गृह सजावट आणि हस्तशिल्प वस्तू या क्षेत्रांसाठी मोठी बाजारपेठ खुली होईल असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला. याशिवाय जेनेरिक औषधं, रत्नं, हिरे आणि विमानाचे भाग यासह विविध श्रेणीतल्या वस्तूंवरचं शुल्क पूर्णपणे रद्द केलं जाणार असल्यानं भारताच्या निर्यातीला आणि मेक इन इंडिया अभियानाला मोठी चालना मिळेल, तसंच हा करार कृषी आणि दुग्धजन्य उत्पादनांच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या हिताचं रक्षण करेल असं गोयल यांनी म्हटलं आहे. या भागीदारीमुळे भारतीय निर्यातदारांसाठी विशेषतः एम एस एम ई, शेतकरी आणि मच्छिमारांसाठी ३० ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सची बाजारपेठ खुली होईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराचं सर्व स्तरातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारत-अमेरिका अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याचं स्वागत केलं असून, ही बाब दोन्ही देशांच्या दृष्टीनं महत्त्वाची आणि आनंदाची असल्याचं म्हटलं आहे. हा करार म्हणजे भारताच्या आर्थिक प्रवासातला महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचं संरक्षण मंत्री **राजनाथ सिंग** यांनी म्हटलं आहे. तर या करारामुळे भारत आणि अमेरिका यांच्यात परस्परांना लाभदायक भागीदारी साकारेल, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ **एस जयशंकर** यांनी व्यक्त केलं आहे.

देशासाठी शेतकऱ्यांचं हित अत्यंत महत्त्वाचं असून या कराराअंतर्गत दुग्धोत्पादन, अन्नधान्य आणि भाजीपाला या क्षेत्रांमध्ये शेतकऱ्यांना संरक्षण देण्यात आलं आहे, असं केंद्रीय कृषिमंत्री **शिवराज सिंह चौहान** यांनी म्हटलं असून हा दोन्ही देशांच्या समृद्ध भविष्यासाठीचा करार आहे, अशा शब्दात पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री **हरदीप सिंग पुरी** यांनी समाधान व्यक्त केलं आहे. तर दोन्ही राष्ट्रांमधली धोरणात्मक आणि आर्थिक भागीदारी मजबूत करण्यासाठी हा करार म्हणजे एक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री **नितीन गडकरी** यांनी व्यक्त केला आहे.

या करारामुळे व्यापाराला चालना मिळेल आणि शेतकरी देखील सक्षम होतील, असं मत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार करारासंदर्भात काँग्रेसनं टीका केली असून या कराराच्या विरोधात आम्ही संसदेच्या सध्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवाज उठवू, असं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. तर राज्यातल्या शेतकऱ्यांच्या दृष्टीनं भारत अमेरिका व्यापार करार निराशाजनक असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. अमेरिकेतून भारतात येणाऱ्या कृषीमालाच्या निर्यातीवरचं शुल्क शून्य टक्के असेल, त्यामुळे त्याचा नकारात्मक परिणाम होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यासाठी आज क्वालालुंपूरमधे पोहोचले. मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांनी त्यांचं स्वागत केलं. प्रधानमंत्री मोदी

यांच्या स्वागतार्थ क्वालालंपूरमध्ये आयोजित 'सेलामत दातांग मोदी जी' या भव्य कार्यक्रमात त्यांनी तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. भारत आणि मलेशिया मधल्या मैत्रीपूर्ण संबंधांचा गौरव यावेळी मोदी यांनी केला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या १०० हून जास्त भारतीय कंपन्या मलेशियात कार्यरत आहेत, भारताचा डिजिटल पेमेंट प्लॅटफार्म युपीआय लौकरच मलेशियात उपलब्ध होईल, असं त्यांनी सांगितलं. मलेशियाच्या प्रगतीत तिथल्या भारतीयांनी दिलेल्या योगदानाचा गौरव मोदी यांनी यावेळी केला.

या दौऱ्यात भारत आणि मलेशिया त्यांच्या सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला अधिक दृढ करण्यासह द्विपक्षीय संबंधांचा सर्वंकष आढावा घेतील.प्रधानमंत्र्यांच्या या दौऱ्यामधे उभय देशात अनेक महत्त्वपूर्ण करार होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज जम्मू इथं जम्मू आणि कश्मीरमध्ये सुरु असलेल्या विविध विकास कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. पायाभूत सुविधांचा विकास आणि लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी यावर या बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. केंद्रशासित प्रदेशात सुरु असलेले विकास प्रकल्प जलद गतीनं पूर्ण करावेत, अशा सूचना केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिल्या. या बैठकीला जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, केंद्रीय गृह सचिव यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

पाकिस्तानकडे वाहणाऱ्या सिंधु नदीचं पाणी अडवून त्याचा वापर हरियाणा, पंजाब, राजस्थान आणि दिल्लीसाठी करण्यात येईल, असं केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी आज सांगितलं. जयपूरमध्ये भाजपा मुख्यालयात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार असून कृती योजनेवर काम सुरु असल्याचं सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्याच्या निवडणुकीसाठी मतदान आज शांततेत पार पडलं.

**राज्यात** आज दुपारी साडेतीन वाजेपर्यंत सुमारे **५२ पूर्णांक २** दशांश टक्के मतदान झालं. वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये दुपारी साडेतीन वाजेपर्यंत झालेल्या मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे

**सिंधुदुर्ग** ५० पूर्णांक १० शतांश टक्के

**धाराशिव** जिल्ह्यात ५० टक्के

**सांगली** ५१ पूर्णांक ४७ शतांश टक्के

**सोलापूर** ७ पूर्णांक ६६ शतांश टक्के

**सातारा** जिल्हा परीषद आणि ११ पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ५१ टक्के

**परभणी** जिल्ह्यात ५५ पूर्णांक ७१ शतांश टक्के

**लातूर** ५० टक्के

**रत्नागिरीत** ४७ पूर्णांक ३८ शतांश टक्के,

**कोल्हापूर** ५८ पूर्णांक ८१ शतांश टक्के',

**पुणे** ५१ टक्के

**छत्रपती संभाजीनगर** ५१ पूर्णांक ५२ शतांश टक्के

आणि **रायगड** जिल्ह्यात ५७ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदान झालं.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगड सीमेवर सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत सात नक्षली मारले गेले असून या भागात आता केवळ सात नक्षली शिल्लक राहिल्याचं पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी आज वार्ताहरांना सांगितलं. या परिसरात तीन दिवस शोधमोहीम सुरू होती, यावेळी सुरक्षा दलांबरोबर नक्षलींची चकमक झाली, यात नक्षलींच्या कंपनी क्रमांक दहा चा प्रमुख प्रभाकर आणि कंपनी क्रमांक पाच चा कमांडर पागु मोड्याम यांच्यासह सात जण मारले गेले. या सात जणांवर मिळून दोनशे गुन्हे दाखल होते, तसंच ७१ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे बिजापूर आणि सुकमा जिल्ह्यात आज ५१ नक्षलींनी आत्मसमर्पण केलं. या सर्वांवर मिळून एक कोटी ६१ लाख रुपयांचं बक्षीस होतं. बिजापूर जिल्ह्यातल्या तीस

नक्षलींनी शस्त्रं त्यागून मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला. यात वीस महिला नक्षलींचा समावेश आहे. त्यांच्यावर एकूण ८५ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

सुकमा जिल्ह्यात २१ नक्षलींनी शरणागती पत्करली. त्यांच्यावर ७६ लाख रुपयांचं बक्षीस होतं. या नक्षलींनी एक ४७ रायफल, एस एल आर आणि इतर शस्त्रं सुरक्षा दलाकडे सुपूर्द केली.

**<><><><><>**

नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी सरकारनं सुरु केलेल्या अभियानामुळे नक्षलग्रस्त भागातलं भीतीचं वातावरण संपलं असून विकासाची नवी पहाट उजाडली असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. छत्तीसगडमधे जगदलपूर इथं बस्तर पंडुम उत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या.

**- -होल्ड बाईट राष्ट्रपती - -**

**<><><><><>**

क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या तिसरा सामना भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर सुरू आहे. या सामन्यात अमेरिकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. ५० धावसंख्येच्या आतच भारताचे चार फलंदाज तंबूत परतले. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १४ षटकांत **६** बाद **८६** धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//